**<u>प्रतिवादी क्र.२ सदानंद गणपत तेली उर्फ कुवळेकर यांचा पुढील उलटतपास वादी तर्फे विधीज्ञ श्री. एल.एल. नाथगोसावी यांचे मार्फत शपथेवर सुरु .</u>**

४१. मी प्रस्तुत प्रकरणी हजर केलेल्या खाते उताऱ्या व्यतिरीक्त सिंधुदुर्ग जिल्हयातील अन्य कोणत्याही बँकेत माझे खाते नाही. सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये माझे खाते आहे. त्या खात्याचा नंबर मला माहीत आहे. त्या खात्याचे उतारे मी प्रस्तुत प्रकरणी हजर करणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या खात्यामधील व्यवहारांचा दावा मिळकतीशी काही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी हजर केलेल्या रेशन कार्डच्या काळामध्ये शासना कडून स्वस्त धान्य मिळत असे. हे म्हणणे खरे आहे की, रेशन कार्डवर जितक्या लोकांचे नाव असेल तितक्या प्रमाणात धान्य वाढीव मिळत असे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वाढीव धान्य मिळावे या करिता मधुकर याचे नाव रेशनकार्डवर नोंद करुन घेतले. हे म्हणणे खरे आहे की, मंगल हिच्या लग्नाच्या वेळेस आमच्या कुटुंबाचे व मोतिराम यांच्या कुंटुंबाचे संबंध चांगले होते. हे म्हणणे खरे आहे की, मंगल ही माझी पुतणी आहे. हे म्हणणे खरे आहे की, मंगल हिच्या होणाऱ्या पतीचे कुटुंब मुंबई येथे राहत असे.

प्रश्न – मंगल हिचे पती हे मुंबई येथे राहत असल्याने लग्न मुंबई येथे करायचे ठरल्याने मंगल हिचा पत्ता तुमचा दिला गेला ?

उत्तर – पत्ता माझा दिला गेला. साक्षीदार स्वत: कथन करतो की, मंगल माझ्या सोबत त्यावेळी राहत होती.

४२. मंगल माझ्या सोबत राहत होती हे दर्शविण्या करिता लग्न पत्रिका हा लेखी पुरावा आहे. मंगल माझ्या सोबत राहत होती हे दर्शविणारा कोणताही शासकीय पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोकणातील परंपरेनुसार एखादा भाऊ राहण्यास मुंबई येथे असतो व एखादा भाऊ राहण्यास कोकणामध्ये असतो. हे म्हणणे खरे आहे की, एखाद्या भावाला धार्मिक कामा करिता मुंबई येथे जायचे असल्यास तो आपल्या मुंबई येथील भावाकडे तात्पुरत्या स्वरुपात राहतो. हे म्हणणे खरे आहे की, मोतिराम याचे कुटुंबिय मंगल हिचे लग्न करण्या करिता तात्पुरत्या स्वरुपात माझ्याकडे येऊन राहिले होते.

४३. अ.क्र.३ च्या मिळकतीमध्ये बांधलेले स्लॅबच्या घराला सत्तर हजार रुपये खर्च आला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर घराच्या बांधकामा करिता मी माझ्याकडे असणारी रक्कम तसेच शिरगाव येथील बँकेच्या शाखेमध्ये असणाऱ्या रक्कमेचा वापर केला. मी वादी यांच्या वकिलांनी दिलेल्या नोटीसीला दिलेल्या उत्तराच्या पान क्र.३ मध्ये " आमच्या अशिलाने सन २०१० साली एकमेकांच्या समजुतीने काही सामाईक मिळकती वाटून घेतल्या आहेत " असा उल्लेख केलेला नाही. आता मला नि.क्र.५१/५ येथील नोटीस दाखविण्यात आली. त्यामध्ये पान क्र.३ वर "आमच्या अशिलाने सन २०१० साली एकमेकांच्या समजुतीने काही सामाईक मिळकती वाटून घेतल्या आहेत" असा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर उत्तराची माहिती मी व माझा भाऊ अशा दोघांनी मिळून वकिलांना दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, उत्तरामध्ये नमुद केलेल्या सामाईक मिळकती म्हणजे दावा मिळकत अ.क्र.१ ते ३ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी उत्तरामध्ये नमुद केलेल्या सामाईक मिळकतीमध्ये दावा मिळकतीपैकी अ.क्र.१ व २ या मिळकती समाविष्ट आहेत. हे म्हणणे खरेनाही की, सन २०१० साली अ.क्र.३ ची मिळकत ही माझी व माझ्या भावाची एकट्याची मिळकत होती हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१० पुर्वी हक्कसोडपत्र करण्या पुर्वी अ.क्र.३ ची मिळकत ही माझी रामचंद्र व मोतिराम यांची सामाईक मिळकत होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर तोंडी वाटपा प्रमाणे नोटीशीत नमुद मिळकत आमच्या अशिलांच्या वाट्यास आली असे नमुद केले आहे. आता साक्षीदार यांना नि.क्र.५१/५ येथील नोटीस दाखविण्यात आली. त्यामध्ये पान क्र.३ वर "सदर तोंडी वाटपा प्रमाणे नोटीशीत नमुद मिळकत आमच्या अशिलांच्या वाट्यास आली" असा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे नाही की, नोटीसीच्या उत्तरात नमुद केलेली मिळकत म्हणजेच अ.क्र.३ ची मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या वकिलांनी आम्हाला पाठविलेल्या नोटीसीमध्ये अ.क्र.३ च्या मिळकतीचा उल्लेख होता. हे म्हणणे खरे नाही की, नोटीसीस दिलेल्या उत्तरामध्ये मला असे म्हणायचे होते की, अ.क्र.३ ची मिळकत ही आमच्या वाटपाला घालण्यात आली. हे म्हणणे खरेआहे की, नोटीसीच्या उत्तरातील पान क्र.३ मध्ये आमचे असे म्हणणे आहे की, मोतिराम याने तोंडी वाटपा प्रमाणे अ.क्र.३ च्या मिळकतीचे हक्कसोडपत्र आम्हाला करुन दिले. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ ची मिळकत तोंडी वाटपाने मला व माझ्या भावाला वाटून

दिली या बाबत माझा कोणताही वाद नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या तोंडी वाटपा प्रमाणे अ.क्र.१ व २ च्या मिळकती मोतिराम यास देण्याचे ठरले होते. ज्या वेळेस नोटीसीस उत्तर दिले त्यावेळेस तोंडी वाटप कोणत्या मिळकतीबाबत झाले आहे याची मला माहीती होती. वादी यास तोंडी वाटपाने कोणत्या मिळकती दिल्या गेल्या हे नोटीसीच्या उत्तरामध्ये नमुद करण्यास मला काही अडचण नव्हती. नोटीसीच्या पान क्र.३ वर तोंडी वाटपा बाबत नमुद केल्या प्रमाणे मी व माझ्या भावाने कृती केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अ.क्र.१ व २ च्या मिळकती देखील मला व माझ्या भावाला मिळाव्यात अशी आमची इच्छा असल्याने आम्ही त्या प्रमाणे कृती केली नाही. नोटीसीच्या उत्तरात नमुद तोंडी वाटप पंचांसमक्ष झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, नोटीसीतील नमुद तोंडी वाटपा प्रमाणे मोतिराम याने त्याचा अ.क्र.३ मधील हक्क आम्हाला सोडायचा व अ.क्र.१ व २ मधील हक्क आम्ही मोतिराम यास सोडायचा असे ठरले होते. हे म्हणणे खरे आहे की, हक्कसोडपत्र झाले त्यावेळेस मोतिराम वयोवृध्द होता. हे म्हणणे खरे नाही की, मोतिराम हा आजारी होता. हे म्हणणे खरे नाही की, हक्कसोडपत्र करण्या करिता आम्ही मोतिराम याच्यावर दबाव आणला होता. हे म्हणणे खरे नाही की, नोटीसीत उल्लेख केलेल्या तोंडी वाटपा प्रमाणे अ.क्र.३ ची मिळकत आम्हाला द्यायची व उर्वरित मिळकत मोतिराम यास द्यायचे असे ठरले होते. माझ्या नोटीसीच्या उत्तराच्या पान क्र.३ वर केलेला तोंडी वाटपाचा उल्लेख व त्याबाबत केलेली कृती ही खोटी आहे असे मला म्हणावयाचे नाही. सन २०१६ साली नोटीसीस उत्तर दिले त्यावेळेस मी उल्लेख केलेल्या तोंडी वाटपाने कोणत्या मिळकती कोणाला दिल्या याची मला माहीती नव्हती. तोंडी वाटपाचा उल्लेख मी माझ्या कैफियतीमध्ये अगर सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये केलेला नाही. तोंडी वाटपा बाबतची माहिती मी माझ्या वकिलांना दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, ज्या वकिलांनी नोटीसीस उत्तर दिले होते त्याच वकिलांनी माझी कैफियत तयार केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नोटीसीच्या उत्तरात उल्लेख केलेल्या तोंडी वाटप हे अ.क्र.१ ते ३ च्या मिळकती बाबत करुन घ्यायचे ठरले होते. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ च्या मिळकतीमध्ये आंबा कलमे, काजूची झाडे तसेच माड आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ही सर्व झाडे बाहेरुन विकत घेऊन लावलेली झाडे आहेत. सदर झाडे खरेदी केल्या बाबत माझ्याकडे लेखी पुरावा आहे.

प्रश्न– सदर लेखी पुरावा तुम्ही न्यायालयात हजर करणार आहात का ?
उत्तर – मला शोधावा लागेल.

४४. हे म्हणणे खरे नाही की, झाडे लावण्या करिता मजूर नेमावे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ च्या मिळकती मध्ये असणाऱ्या विहीरीवरील पंपशेड पुर्वी मोतिराम याच्या नावावर होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर विहीर ही मोतिराम याने खणली आहे.

**मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब......**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

(श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

दि.२४/०२/२०२६